## मंगळवार, दिनांक २२ मार्च २०११

विधान परिषदेची बैठक, विधान भवन, मुंबई येथे मंगळवार, दिनांक २२ मार्च २०११ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू झाली.

### माननीय उपाध्यक्ष श्री. वसंत पुरके हे अध्यक्षस्थानी होते

### सभागृहातील कामकाजासंबंधी

### ( अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष )

### वसई-विरार महानगरपालिकेतून ३५ गावे वगळण्याबाबत

( सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडित वेलमध्ये येऊन बसतात.)

**श्री. गिरीष बापट :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडित वेलमध्ये येऊन बसलेले आहेत. त्यांचे दु:ख असे आहे की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहामध्ये त्यांना वसई-विरार महानगरपालिकेतून ३५ गावे वगळण्याचे आश्वासन दिले होते. परंतु अद्याप त्या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही. म्हणून ते क्लेश व्यक्त करण्याकरिता आज विधान भवनाच्या पायऱ्यांवर उपोषणाला बसणार आहेत. म्हणून शासनाने यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी माझी विनती आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बसतात.)

**श्री. हर्षवर्धन पाटील :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडित यांचे निवेदन आपल्याला प्राप्त झालेले आहे आणि त्या निवेदनाची एक प्रत मलासुद्धा मिळालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडित आज सकाळी मला भेटले होते. माझी अशी विनंती आहे की, आपण प्रश्नोत्तराचा तास पूर्ण करावा. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर या विषयावर चर्चा करता येईल.

**उपाध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर आपले म्हणणे ऐकून घेतले जाईल. सन्माननीय सदस्य श्री. आर. एम. वाणीसाहेब, आपण सर्वांनी मघाशी छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेतलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडितसाहेब, आपण अजून थोडे विवेकाने वागलात तर अधिक चांगले होईल. सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसावे. सन्माननीय सदस्यांच्या भावनांची दखल घेतली जाईल. आता आपण प्रश्नोत्तराचा तास सुरू करू.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे** (पाटील) : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात आश्वासन दिलेले आहे की, वसई-विरार महानगरपालिकेतून ३५ गावे वगळण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडित यांनी यासंदर्भात वारंवार आग्रह धरला, मागील अधिवेशनामध्ये उपोषण केले, मोर्चा काढला, पायी चालत आले. परंतु शासनाने त्यांना जे आश्वासन दिले होते त्याची अद्याप पूर्तता झालेली नाही. मग त्यांच्याकडे दुसरा मार्ग काय आहे ? सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी यासंदर्भात आश्वासन दिलेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता व्हावी म्हणून त्यांनी अनेक वेळा शांततामय मार्गाने आंदोलन केलेले आहे. माझी विनंती आहे की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर किंवा आज दिवसभरामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी किंवा संबंधित मंत्रिमहोदयांनी यासंदर्भात सभागृहात खुलासा करून त्यांना आश्वासन दिले पाहिजे की, आम्ही या कालावधीत ही कार्यवाही पूर्ण करू.

**उपाध्यक्ष** : प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर मी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना विनंती करीन आणि ते यासंदर्भात खुलासा करतील. आता सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसावे.

## तोंडी उत्तरे

## (तारांकित प्रश्न)

### राज्यातील सर्व रेशनकार्ड रद्द करून स्मार्ट कार्ड देण्याचा राज्य शासनाचा निर्णय

**(१) * ३६८५९ श्री.गणपतराव देशमुख** (सांगोले) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) राज्यातील स्वस्त धान्य दुकानातून धान्य, पामतेल व रॉकेलचा काळाबाजार रोखण्यासाठी सर्व रेशनकार्ड रद्द करून पुढील वर्षाच्या सुरूवातीला स्मार्ट कार्ड देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, केंद्र शासनाने देशातील व राज्यांतील नागरिकांना युनिक आयडेंटी कार्ड (आधार) देण्याचा निर्णय घेतला आहे त्याच्यामध्येच धान्य कार्डाचा समावेश करण्यात येणार आहे हे खरे आहे काय ;

(३) असल्यास, स्मार्ट कार्ड देण्याची योजना तातडीने राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख** : (१), (२) व (३) *अंशत: खरे आहे, नाही, तथापि लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्था व शिधापत्रिका संगणकीकरणाचा पथदर्शी प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित असून उच्चाधिकार समितीने प्रस्तावास तत्त्वत: मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने यु.आय.डी. क्रमांकाचा सदर प्रकल्पामध्ये वापर करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**श्री. ग. आ. देशमुख :** अध्यक्ष महोदय,.....

**श्री. अनिल देशमुख :** अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये दुरूस्ती करू इच्छितो. उत्तर क्र. (१), (२) व (३) च्या सुरूवातीला "नाही." असे नमूद केलेले आहे त्याऐवजी "अंशत खरे आहे" असे वाचावे.

**श्री. ग. आ. देशमुख :** अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी आता उत्तरामध्ये दुरूस्ती केलेली आहे. परंतु हे उत्तर वाचल्यानंतर त्यातून काहीच बोध होत नाही. शासनाला यासंदर्भात नेमके काय म्हणावयाचे आहे ? माननीय मंत्रिमहोदयांनी अंशत: खरे आहे अशी उत्तरामध्ये दुरूस्ती केलेली आहे. परंतु पुढे असे म्हटलेले आहे की, "तथापि लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्था व शिधापत्रिका संगणकीकरणाचा पथदर्शी प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित असून उच्चाधिकार समितीने प्रस्तावास तत्त्वत: मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने यु.आय.डी. क्रमांकाचा सदर प्रकल्पामध्ये वापर करण्यात येणार आहे." म्हणजे शासनाला नेमके काय म्हणावयाचे आहे ?

---

*** सभागृहात सुधारले.**